# व्यक्ती-वल्ली - ज्येष्ठ पत्रकार ‘कुमार देवराय कदम’: भाग १

नमस्कार,

कुमार कदम हा माझा बालमोहन शाळेपासूनचा मित्र. आपापल्या क्षेत्रात कुमार व त्याची पत्नी चंद्रकला यांनी जी अभिनंदनीय यशोकिर्ती मिळविली आहे, ती मी अभिमानाने व आनंदाने दोन भागात शब्दबद्ध केली आहेत. पहिला भाग ‘ज्येष्ठ पत्रकार ‘कुमार देवराय कदम’ आहे व दुसरा भाग आहे 'सुप्रसिध्द चित्रकर्ती चंद्रकला कुमार कदम'. सवडीने वाचल्यावर आपला प्रतिसाद येईलच आणि तो या दोघांना दिलेला मानाचा मुजरा असेल. असो. आपण तब्बेतीला सांभाळून रहावे. धन्यवाद.

आपला,

जयंत.

Sharing is Caring...

---

‘कुमार देवराय कदम’ हा माझा बालमोहन शाळेतील वर्गमित्र. जो आपल्या व्यवसायात २४/७ बिझी असूनही माझ्याशी आजतागायत प्रेमाने व जाणीवपूर्वक ईमेलवर संपर्क ठेऊन आहे. हल्ली बरेच जण स्वतःचं प्रतिबिंब पाहाण्यात WhatsAppच्या राक्षसी जाळ्यात डोकं खुपसून असतात. परंतु, सुदैवाने त्यात मी नसल्याने बहुअंशी मंडळी माझ्याशी ईमेलवर संपर्कात नाहीत. हे माझं नसून त्यांचं नुकसान आहे असं मी समजतो. असो. शाळेत असतांना कुमार हा सर्व विषयात अत्यंत हुशार विद्यार्थी होता. विशेषतः मराठी भाषेवरील त्याचं प्रभुत्व वाखाणण्यासारखं होतं. परंतु, मध्येच आम्हाला सोडून तो धोबीतलावच्या एलफिन्स्टन टेक्निकल हायस्कूलमध्ये गेला. पुढे पाटकर कॉलेजमधून प्रिंटींग टेक्नॉलॉजी केलं. आणि नंतर ट्रेड युनियॅनिझम ॲन्ड इंडस्ट्रियल रिलेशन्स मध्ये डिप्लोमा घेतला. म्हणजे तो लेखक, साहित्यिक, पत्रकार, टीकाकार किंवा कदाचित राजकीय पुढारी होईल याची शक्यता त्यावेळी वाटत होती. आणि

कालांतराने अगदी तसंच झालं. स्वतःच्या कर्तबगारीवर कुमारने वृत्तपत्रव्यवसायात नावलौकीक कमावला, नामवंत पत्रकार झाला व आज तो पूर्वीच्या परंपरेतील (भष्टाचाराला न शिवलेला) एका दर्जेदार महाराष्ट्र वृत्त सेवा (महावृत्त) याचा संस्थापक व संपादक आहे. Proud to mention, Mahavrutta.com is the first Marathi online news agency which is managed by the experienced journalists as a Free service to the Marathi readers all over the world. Mahavrutta.com is updated daily, regularly and many a times news are flashed even quicker than the Television channels. They are dedicated reporters all over the Maharashtra who work diligently as part of a Social Service. Mahavrutta.com is completely free but not cost-free.







*१) माझा मित्र, सुप्रसिद्ध पत्रकार व संपादक कुमार कदम... कुमार कदम याच्या सौजन्याने... २) ३० वर्षांपूर्वी मुंबईत झालेल्या आमच्या शाळकरी वर्ग मित्रांच्या भेटीत. डावीकडून: राजन राऊत, कुमार कदम, सुप्रसिध्द चित्रकर्ती सौ. चंद्रकला कदम व मी... ३) डावीकडून: राजन राऊत, कुमार कदम, सौ. चंद्रकला कदम व दिलीप गोखले...*

कुमारच्या गेल्या पन्नास वर्षातील महत्वाच्या गोष्टींचा थोडक्यात आढावा घ्यायचाच झाला तर, लहान वयातच कुमारने १९८६ साली, गणपतीपुळे येथे झालेल्या तिसाव्या मराठी पत्रकार परिषदेचे अध्यक्षपद भूषविले होते. हे निश्चित कौतुकास्पद होतं. विद्यार्थी दशेत असतानाच (जून १९७१) 'रविवारच्या लोकसत्ता' मध्ये 'ज्ञान मंदिरातील लाचखाऊंना आवरा' या शीर्षकाखाली लेख लिहून शाळांतून

प्रवेशासाठी घेण्यात येणाऱ्या सक्तीच्या देणग्यांच्या विरोधात सर्वप्रथम आवाज कुमारने उठविला होता. तसेच भारतीय विद्यार्थी सेनेचा एकेकाळी तो संस्थापक व संघटक होता. शिवाय, अनेक वर्ष पत्रकारितेत असतांना कोकण हा कुमारचा अभ्यासाचा विषय होता. कोकणनामातून ते कोकणातील विविध चालीरिती, समस्या तसेच, सांस्कृतिक घडामोडींचा वेध घेणाऱ्या असंख्य माहितीपूर्ण लेखमाला त्याने लिहिल्या होत्या. त्या येथे वाचाव्यात:
https://blogs.maharashtratimes.indiatimes.com/author/kumarkadam/?frmapp=yes and
https://www.youtube.com/watch?v=QmrK0ALofp4

जुलै २००१पासून सप्टेबर २०१३पर्यंत सतत बारा वर्षे स्तंभलेखकम्हणून 'दैनिक महाराष्ट्र टाइम्स'मधील 'मराठी मुलखात कोकण' या सदरासाठी नियमितपणे लिखाण व कोकण संबंधित वृत्त संकलन केले. इतक्या दीर्घकाळ एकाच प्रांतिक विषयावर सातत्याने लिखाण करण्याचा महानगरातील वृत्तपत्रातील हा एक विक्रम होता. यासाठी त्याला मुंबई मराठी पत्रकार संघातर्फे दिला जाणारा कोकण विषयक लिखाणासाठीचा 'कोकण वैभव' पुरस्कार, प्रथम वर्षीचा (सन २००२) पुरस्कारही मिळाला होता.



*१) भारताचे तत्कालीन उपपंतप्रधान स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या समवेत कुमार कदम... २) महाराष्ट्र-कर्नाटक सीमावादाच्या आंदोलनाचे नेते, महाराष्ट्र एकीकरण समितीचे बेळगावचे माजी आमदार स्व. बा. रं. सुकटणकर यांच्या समवेत कुमार कदम... ३) महाराष्ट्र विधान परिषदेचे तत्कालीन अध्यक्ष, लोकमान्य टिळकांचे नातू स्व. जयंतराव टिळक यांच्या समवेत कुमार कदम... ४) जम्मू-काश्मीरचे तत्कालीन मुख्यमंत्री फारूख अब्दुल्ला यांच्या समवेत (१९८३) कुमार कदम...*

सामाजिक क्षेत्रातीलही त्याने उल्लेखनीय कामगिरी बजाविली होती. ती अशी: १) अध्यक्ष, ऑर्गनायझेशन फॉर प्रोटेक्शन ऑफ एन्व्हायरोन्मेंट ॲन्ड नेचर (ओपन), सहभाग. २) उपाध्यक्ष, पुष्पा ॲकॅडमी फॉर न्युट्रीशन ॲन्ड हेल्थ अवरनेस, मुंबई. ३) सरचिटणीस, शहीद ले.कर्नल मनिष कदम (कीर्ति चक्र) फौंडेशन, कुडाळ, जि.सिंधुदुर्ग. ४) सल्लागार, बॅ.नाथ पै नर्सिंग कॉलेज ट्रस्ट, कुडाळ, जि. सिंधुदुर्ग. ५) सदस्य, देवरुख शिक्षण प्रसारक मंडळ, देवरुख, जि. रत्नागिरी. विशेष उल्लेखनीय बाबी: सीमा लढा-कर्नाटकातील मराठी भाग महाराष्ट्राला जोडावा या मागणीसाठी गेली ५३ वर्षे सुरु असलेल्या लढ्याला पाठींबा देण्यासाठी साथी एस.एम.जोशी यांच्या नेत्तृत्वाखाली स्थापन झालेल्या सर्व पक्षीय संयुक्त महाराष्ट्र सीमा समितीचा चिटणीसम्हणून प्रारंभापासून गेली ४० वर्षे कार्यरत आहे. सीमा लढ्यात त्याने अनेक महत्त्वाच्या भूमिका पार पाडल्या होत्या. त्यात, 'बॉम्बे'चे 'मुंबई' करण्यासाठी आंदोलन सुरु करण्यात पुढाकार घेतला होता. पोलीस आंदोलन - १९८१ साली महाराष्ट्रातील पोलीस कर्मचाऱ्यांनी अंतुले सरकारच्या परवानगीने स्वत:ची संघटना बांधली होती. या संघटनेच्या वतीने १९८२ मध्ये विविध मागण्यांसाठी आंदोलन करण्यात आले होते. तत्कालीन भोसले सरकारने या आंदोलनाला 'पोलीसांचे बंड' असे नाव देऊन सुमारे ९०० पोलीस शिपायांना बडतर्फ केले होते. या प्रकरणी वृत्तपत्रातून सातत्याने लिखाण करून तसेच न्यायालयात जाऊन पोलिसांचे बंड झाले नव्हते हे सिध्द करून दाखविण्यात तसेच सर्व बडतर्फ शिपायांना पुन्हा कामावर घेण्यात महत्त्वाची कामगिरी बजावली होती. यासाठीची कुमारने न्यायालयीन लढाई तब्बल २२ वर्षे इतकी प्रदीर्घ काळ आणि सर्वोच्च न्यायालयापर्यंत चालविली. त्यामुळे देशोधडीला लागणारे ९०० संसार वाचविण्याचे समाधान मिळाले होते. खाजगी सुरक्षा रक्षकांची संघटना बांधण्यात तसेच सुरक्षा रक्षकांसाठी माथाडी बोर्डाच्या धर्तीवर स्वतंत्र बोर्ड स्थापन करण्याच्या कामात महत्त्वाचे योगदान कुमारने केले होते.




*१) महाराष्ट्राचे मुख्यमंत्री स्व. वसंतदादा पाटील यांच्या समवेत (१९८४) कुमार कदम... २) ज्येष्ठ पत्रकार दै. लोकसत्ताचे संपादक स्व. माधवराव गडकरी आणि ज्येष्ठ पत्रकार दै. गोमातकचे संपादक स्व. नारायणराव आठवले उर्फ अनिरुध्द पुनर्वसू यांच्या समवेत कुमार कदम... ३) महाराष्ट्राचे मुख्यमंत्री स्व. बाबासाहेब भोसले यांच्या समवेत (१९८३) कुमार कदम... ४) पत्रकार सहकारी, बेळगाव येथील दैनिक तरुण भारतचे संपादक किरण ठाकुर, ज्येष्ठ पत्रकार स्व. बाळ देशपांडे, ठाणे येथील दैनिक कोकण सकाळचे संपादक राजाराम माने, नांदेड येथील दैनिक प्रजावाणीचे सहसंपादक स्व. नंदकुमार देव यांच्या समवेत कुमार कदम...*

कुमारला मिळालेले पुरस्कार कांही कमी नाहीत. गुरूनाथ कुलकर्णी स्मृती-समारोह संयोजन समितीतर्फे दिला जाणारा ‘गुरुकुल कोकण सन्मान पत्रकार पुरस्कार', कोकण विषयक लिखाणासाठी (सन २०१२). पत्रकार वरुणराज भिडे मित्र मंडळ, पुणे यांच्या विद्यमाने पत्रकारितेच्या क्षेत्रात लक्षणीय कामगिरीबद्दल देण्यात येणारा 'पत्रकार वरुणराज भिडे स्मृती पुरस्कारा'च्या 'मुख्य पुरस्कारा'साठी मानकरीम्हणून निवड (सन २०१२). ज्येष्ठ पत्रकार, 'शिवनेरकार स्व. विश्वनाथराव वाबळे पुरस्कारा'ने सन्मानित (२०१३). श्रीसिध्दीविनायक गणपती मंदिर ट्रस्ट, प्रभादेवी, मुंबईतर्फे पत्रकारीता क्षेत्रातील सर्वोत्कृष्ट कार्याबद्दल देण्यात येणाऱ्या ‘श्रीसिध्दीविनायक उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार’, व २०१३ साठी मानकरी म्हणून निवड (सन २०१३).

महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोष निर्मिती मंडळाचे सदस्य व ज्येष्ठ पत्रकार माधव शिरवळकर ‘संपर्कपटू पत्रकार कुमार कदम' या लेखाची सुरवातच अभिमानाने अशी करतात की, *“संसदेत जे खासदार अतिशय क्रियाशील, संसदीय कामकाजाची उत्तम माहिती असलेले असतात त्यांचेसाठी ‘संसदपटू’ हा अर्थपूर्ण शब्द आहे. ज्यांना नुकताच मुंबईच्या श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यासाचा “श्रीसिध्दिविनायक*

*उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार २०१३” जाहीर झाला आहे असे ज्येष्ठ पत्रकार कुमार कदम यांचा उल्लेख त्यांचे अनेक मित्र ‘संपर्कपटू’ असा करतात. खरं तर संपर्काची कला सर्वच पत्रकारांमध्ये पुरेशी असायला हवी. पत्रकारांमध्ये हे संपर्काचं कौशल्य कमी-अधिक प्रमाणात सर्वच ठिकाणी आढळतं. संपर्ककलेचा प्रत्येकाचा आपला एक दर्जाही असतो. म्हणजेच पत्रकाराच्या ठायी असलेली संपर्ककला ही फार कमी नाही, उतू जावी इतकी अधिक नाही आणि इतरांना हेवा वाटावा इतकी दर्जेदारही आहे असा त्रिवेणी संगम असलेल्या व्यक्तीमत्त्वास संपर्कपटू असे म्हणता येईल. कुमार कदम यांचे परिपूर्ण संपर्कपटूत्व नेमके असे आहे. यात वाद नाही..."*



*१) पत्नी सौ. चंद्रकला हिच्या समवेत कुमार कदम... २) मा. शिवसेना प्रमुख स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्यासोबत कुमार कदम... ३) मा. शरद पवार यांच्याकडून पुष्पगुच्छ स्वीकारताना कुमार कदम. सोबत महाराष्ट्र टाईम्सचे माजी संपादक आणि माजी राज्यसभा सदस्य भारतकुमार राऊत...*

एखादं वृत्तपत्र चालविणे म्हणजे, सोपी गोष्ट नव्हे. कारण, त्यात मुख्यतः वार्ता तसेच मते, जाहिराती, रंजक व अन्य पूरक मजकूर यांचा समावेश असतो. शिवाय, ठरलेल्या वेळी नियमितपणे छापून वितरित केले जाणारे प्रकाशन म्हणजे ‘वृत्तपत्र’ (न्यूज पेपर). त्यात रोजच्या ताज्या घडामोडींच्या वार्ता देणे, जाहिराती प्रसृत करुन उद्योग व व्यवसायाला चालना देणे, लोकमत घडवणे व प्रभावित करणे तसेच लोकमताचे नेतृत्व करणे, प्रबोधन करणे, शासनसंस्थेवर अंकुश ठेवणे अशा विविध उद्दिष्टांनी आधुनिक नागर संस्कृतीत विकसित झालेल्या संस्था, असे वृत्तपत्र-माध्यमाचे वर्णन केले जाते. मग त्यात स्थानिक, देशांतर्गत आणि जागतिक

स्वरुपाच्या विविध बातम्या ताबडतोब पुरवणे, हा वृत्तपत्रांचा मुख्य हेतू जो इतर नियतकालिकांपेक्षा त्यांचे वेगळेपण स्पष्ट करणारा असतो. तसेच घडलेल्या घटनेचा योग्य अन्वयार्थ लावून त्यावर भाष्य करणे, संपादकीय दृष्टीकोनातून मतप्रदर्शन करणे, हेही आधुनिक वृत्तपत्राचे महत्त्वाचे अवतारकार्य मानले जाते. आणि म्हणून वृत्तपत्रास सामान्य माणसाचे विद्यापीठ मानले जाते ते उगाचच नाही. त्या अनुषंगाने माहिती, मनोरंजन, मार्गदर्शन व सेवा ही वृत्तपत्राची चार प्रकट कार्ये होत. आणि ही सर्व कार्ये अथवा जनसेवा आमच्या कुमारने (भ्रष्टाचाराला बळी न पडतां) निस्वार्थीपणे व निष्ठेने गेली अनेक वर्ष यशस्वीपणे पार पाडली. हे निश्चितच भूषणावह व कौतुकास्पद आहे. आज कुमारने नाईलाजाने त्यातून निवृत्ती स्विकारली आहे. असे तो म्हणतो. आणि त्याचं कारणही मी समजू शकतो. माझ्या कांही प्रश्नाला उत्तर देतांना कुमार स्पष्टपणे म्हणतो, *"अरे जयु, पुस्तकं-बिस्तकं प्रकाशित करणाऱ्यातला मी नाही. आणि ती विकत घेऊन हल्ली वाचतो कोण..? सुशिक्षित वाचवर्ग जुन्या पिढीसह नष्ट झाला आहे. तसेच, आमच्याही क्षेत्रात भ्रष्टाचार कळसाला पोहोचला आहे. अधिक काय बोलू..?"* असो.






*१) मुंबई दूरदर्शनवरून होणाऱ्या मराठी कार्यक्रमांवर दिल्लीहून केल्या जाणाऱ्या अन्यायाविरूध्द आयोजित केलेल्या मोर्च्याचे नेतृत्व करताना कुमार कदम. या मोर्च्यात स्व. सुधीर उर्फ बाबुजी फडके, नटश्रेष्ठ स्व. दाजी भाटवडेकर, मुंबईचे तत्कालीन महापौर स्व. मनमोहन सिंह बेदी, माजी महापौर स्व. डॉ. प्रभाकर पै, माजी महापौर सुधीर जोशी, छगन भुजबळ, स्व. शरद आचार्य, स्व. आर. आर. कदम, रमण अंकलेश्वरीया, आमदार मधू देवळेकर, आमदार मनोहर जोशी, आमदार स्व. प्रमोद नवलकर आदी नेतेमंडळी सहभागी झाली होती. या मोर्च्यामुळे केंद्र सरकारला मराठीसाठी दूरदर्शनवर दुसरे स्वतंत्र चॅनेल सुरू करणे भाग पडले... २) लोणावळा येथील प्रकल्पाची पहाणी करताना मुंबई मराठी पत्रकार संघाचे तत्कालीन अध्यक्ष कुमार कदम,*

*सोबत तत्कालीन कोषाध्यक्ष स्व. ग. का. रायकर, संयुक्त कार्यवाह स्व. सुहास फडके, उपाध्यक्ष स्व. यशवंत पिंपळीकर कार्यवाह दिवाकर देशपांडे... ३) तत्कालीन (१९८२) बिहार सरकारने वृत्तपत्र स्वातंत्र्यावर निर्बंध घालण्यासाठी आणलेल्या विधेयकाविरुध्द देशपातळीवर झालेल्या आंदोलनाचे मुंबईमध्ये नेतृत्व करताना कुमार कदम...*

आमची शाळा सुटल्यानंतर सहाजिकच आमचे मार्ग बदलले होते. तरीही माझा व कुमारचा संपर्क तुटला नव्हता. सुमारे तीस वर्षांपूर्वी आम्ही जेव्हा मुंबईत गेलो होतो तेव्हा, कुमार व चंद्रकला खास आम्हाला भेटायला आले होते. त्यावेळी चंद्रकला ही थोर चित्रकार-कलाकार असल्याचे समजले होते. पुढे लवकरच तिने त्या क्षेत्रात अभिमानास्पद कामगिरी केल्याचे कळले होते. आज सांगायला अभिमान वाटतो, कुमारची पत्नी सौ. चंद्रकला ही जागतिक कीर्तीची सुप्रसिध्द चित्रकर्ती ओळखली जाते. भारतीय संसदेच्या मध्यवर्ती सभागृहातील स्वा. वि.दा. सावरकर यांचे, तसेच महाराष्ट्र विधान भवनातील अनेक तैलचित्रे आपल्या कुंचल्यातून तयार करून देण्याची कामगिरी तिने केली आहे. स्व. राम गणेश गडकरी, स्व. मामा वरेरकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, स्व.यशवंतराव चव्हाण यांच्या शताब्दी सोहळ्यानिमित्त महाराष्ट्र शासनाच्यावतीने प्रकाशित करण्यात आलेल्या 'लोकराज्य' या मुखपत्रावरील तसेच, आतील सर्व तैलचित्रे चंद्रकलाने साकारली आहेत. त्याचप्रमाणे, मुलगा सिध्दार्थ मास्टर ऑफ कॉम्प्युटर ॲप्लिकेशनचा पदवीधर असून सध्या सॉफ्टवेअर इंजिनियर म्हणून काम करीत आहे.

अशा या माझ्या शाळकरी मित्रावर चार ओळी लिहितांना मला मनस्वी आनंद होतोय. मंडळी, आत्तापर्यंत मी ज्या कांही लेखमाला लिहिल्या त्यासाठी मला मुंबईहून कांहीही माहिती अथवा संदर्भ हवे असतील तर, स्वतःचा वेळ बाजूला करून कुमार मला विश्वासाने उलट टपाली तत्परतेने मदत करतो. हे माझं भाग्य आहे. मला माहित आहे की, बऱ्याच वर्षांपूर्वी कुमार एका जीवघेण्या आजारातून वांचला होता. आणि अशावेळी त्याच्या सौभाग्यवतीने त्याला न डगमगता धिटाईने सर्वतोपरी दिलेला आधार अत्यंत महत्वाचा होता. त्याला तोड नव्हती. थोडक्यात, त्यातून तो

बरा होऊन त्याला पुनर्जन्म मिळाला होता.

आपल्या सुस्वरूप पत्नीवर प्रभावित होऊन कुमार (कुमार वयात नसूनही) आपल्या वैचारिक लेखनशैलूतून चंद्रकलेच्या सर्व छटा प्रेमाने चित्रित करून म्हणतो, *“चंद्रकला म्हणजे विविध छटा असलेल्या रंगाचा एक पॅलेट आहे. आणि मी एक कोरा कॅनव्हास आहे. असं मला नेहमी वाटतं. या कॅनव्हासवर ती तिच्या मूडप्रमाणे कुंचल्याने फटकारे मारत असते. ते कधी गुलाबी असतात, कधी हिरवेगार असतात, कधी धामणीसारखे पिवळे धमक असतात, तर कधी काळे असतात. हे रंग एकमेकात मिसळून जात असल्यामुळे या कॅनव्हासवर कधी मोहक, कधी उदास, तर कधी आल्हाददायक असे तऱ्हेतऱ्हेचे भाव उमटत असतात. आयुष्याच्या वाटेवरून जातांना चंद्रकलाच्या बाबतीत माझा सहवासही तसाचा आहे.”* असो. अशा या बुद्धिमान व पत्रकार मित्राला उत्तम आरोग्यासह दीर्घायुष्य लोभो ही सदीच्छा येथे व्यक्त करतो.

जयंत विठ्ठल कुळकर्णी.
jvkny1@gmail.com

---

## व्यक्ती-वल्ली - सुप्रसिद्‌ध चित्रकर्ती सौ. चंद्रकला कुमार कदम: भाग २



नमस्कार,

१४ जून, २०१७च्या सकाळमध्ये छापून आलेली एक बातमी वाचली होती की, *“आगीत खाक झालेली तैलचित्रे पुन्हा रेखाटणार” अशी बातमी वाचली. त्यात लिहिलं होतं, २००० मध्ये जेव्हा मुंबई महापालिकेच्या सभागृहाला लागलेल्या भीषण आगीत जाळून खाक झालेली नऊ तैलचित्रे पुनः रेखाटली जाणार आहेत. त्यासाठी पालिका प्रशासन ४७ लाख रुपये खर्च करणार आहेत. आणि ज्येष्ठ चित्रकार चंद्रकला कुमार कदम यांच्या कुंचल्यातून ही सर्व चित्रे पुनः साकारली जाणार आहेत. ही नऊ तैलचित्रे अशी आहेत, शिक्षणतज्ञ सर विठ्ठल नारायण चंदावरकर, मुंबईचे पहिले महापौर जहांगीर बोमन बेहराम, स्वातंत्र्यसैनिक सदाशिव कानोजी पाटील, सरदार वल्लभभाई पटेल यांचे बंधू, विठ्ठलभाई जवेरभाई पटेल, इब्राहिम रहिमततुल्ला, सर फिरोजशहा मेरवानजी मेहता, भरातीय नॅशनल काँग्रेसचे संस्थापक दिनशा रसुलजी वाच्छा, युसूफ जे. मेहरअली व माजी महापौर व वकील खुर्शीद फ्रामजी नरीमन. पुढील दोन व्यक्तींची चित्रे सुरक्षित राहिली होती. ती म्हणजे, दानशूर जगन्नाथ शंकरशेठ व शिक्षणतज्ञ मोरेश्वर वासुदेव दोंदे. यांची होत. चंद्रकला कदम यांनी*

*चित्रांचा अभिलेख शोधून काढल्यामुळे ही चित्रे रेखाटण्याची जबाबदारी महापालिकेने त्यांच्यावर सोपिवली आहे. आठ फूट उंच आिण पाच फूट रुंदीच्या प्रत्येक तैलचित्रांसाठी पालिका पाच लाख 25 हजार रुपये खर्च करणार आहे. पालिकेतील गटनेत्यांच्या सोमवारी (ता. १२) झालेल्या बैठकीत या नऊ तैलचित्रां-साठी ४७ लाख २५ हजार रुपये खर्च करण्याचा प्रस्ताव मंजूर करण्यात आला."* मंडळी, सांगायला अभिमान वाटतो की, चंद्रकलाने ही सर्व भव्य नऊ पेंटिंग्स कांही महिन्यापूर्वीच पूर्ण केली. आज ती ऐतिहासिक तैलचित्रें मुंबई महापालिकेच्या सभागृहात पूर्वीच्या जागी सन्मानाने स्थानबद्ध झाली आहेत. थोडक्यात, चंद्रकलाच्या कुंचल्यातून इतिहास पुन्हा जिवंत केला गेला असं म्हणणं उचित ठरेल...



***चंद्रकला व कुमार कदम यांच्यासमवेत ती ऐतिहासिक तैलचित्रें: १) २००० मध्ये जेव्हा मुंबई महापालिकेच्या सभागृहाला लागलेल्या भीषण आगीत जाळून खाक झालेल्या तैलचित्रांना पुनः जीवदान देणाऱ्या चंद्रकलेने रेखाटलेली आठ फूट उंच आिण पाच फूट रुंदीची भव्य नऊ तैलचित्रें: भरातीय नॅशनल काँग्रेसचे संस्थापक दिनशा रसुलजी वाच्छा... २) सर फिरोजशहा मेरवानजी मेहता...***

***३) इब्राहिम रहिमततुल्ला... खाली: १) माजी महापौर व वकील खुर्शीद फ्रामजी नरीमन.. स्वातंत्र्यसैनिक सदाशिव कानोजी पाटील... युसूफ जे. मेहरअली... २) मुंबईचे पहिले महापौर जहांगीर बोमन बेहराम... सरदार वल्लभभाई पटेल यांचे बंधू, विठ्ठलभाई जवेरभाई पटेल... व शिक्षणतज्ञ सर विठ्ठल नारायण चंदावरकर...*** *कुमार व चंद्रकला कदम यांच्या सौजन्याने...*

 

घरची परिस्थिती खास नसतांनाही आपल्या वडिलांच्या उत्तेजनेमुळे व प्रोत्साहनामुळे चित्रकलेची आवड असलेल्या चंद्रकला यांनी सर जे. जे. स्कुल ऑफ आर्ट मधून जिद्दीने आपलं शिक्षण पूर्ण केलं होतं. अर्थात, शिक्षणाचा भर 'व्यक्तिचित्रण' यावर होता. त्यावेळी १९७७-७८ साली, तिने स्वतः काढलेले स्वतःचे तैलचित्र बॉबे आर्ट सोसायटीच्या प्रदर्शनात ठेवले होते. आश्चर्य म्हणजे, ते चित्र एका जर्मन बाईने विकत घेतले होते. आणि चंद्रकला हीचा उत्साह विश्वासासह साहजिकच द्विगुणित झाला होता. तसेच, 'अल्ट्रझा क्लब' तर्फे शिष्यवृत्तीही देण्यात आली होती. सर जे. जे.त शिक्षण घेत असतांना दर वर्षी होणाऱ्या प्रदर्शनात चंद्रकला हिने प्रति वर्षी चित्रकलेत पारितोषिके मिळविली होती. शिक्षणानंतर चित्रकलेच्या व्यवसायात गुंतल्यावर सुप्रसिद्ध साहित्यिक मामा वरेकर यांच्या जन्मशताब्दीनिमित्ताने तयार केलेल्या तैलचित्राची प्रशंसा यशवंतराव चव्हाण यांनी केली होती. ते तैलचित्र मी पहिले नसते तर, माझ्या आयुष्यातील एक सरावात मोठ्या आनंदाला मुकलो असतो असे उदगार त्यावेळी यशवंतराव चव्हाण यांनी काढले होते. हा तिचा बहुमान होता. चंद्रकलानी आजवर अनेक संस्थांसाठी मान्यवरांची तैचित्रे रेखाटली आहेत. यामध्ये इंदिरा गांधी यांच्या काढलेल्या तैलचित्राबद्दल भावनिक अमियता म्हणजे, एक आगळ्यावेगळ्या मूडमध्ये तयार केलेलं इंदिराजींचं तैलचित्र दुर्दैवाने त्यांच्या पर्यंत पोहोचण्याआधीच त्यांची हत्या झाली होती. त्यानंतर चंद्रकला हिने इंदिराजींच्या बाल्यावस्थेपासून मृत्यूपर्यंत वेगवेगळ्या मुडमधील तैलचित्रे काढून 'मूड्स ऑफ इंदिरा' या शीर्षकाखाली प्रदर्शन आयोजित केले होते. ही त्यांना दिलेली एक वेगळी भावपूर्ण श्रद्धांजली होती.



*१) दिल्लीत पार्लमेंटच्या मध्यवर्ती सभागृहात राष्ट्रपती अब्दुल कलाम यांच्या हस्ते चंद्रकलानी साकारलेले वीर सावरकर यांच्या तैलचित्राचं अनावरण करतांना. चंद्रकला, सुषमा स्वराज, पंतप्रधान वाजपेयी, लोकसभेचे मनोहर जोशी आणि लालकृष्ण अडवाणी... २) वीर सावरकर यांच्या तैलचित्रासह बाळासाहेब ठाकरे यांच्या समावेत चंद्रकला... ३) उपराष्ट्रपती भैरोसिंग शेखावत यांच्या हस्ते गुजरातच्या विधानसभेत वीर सावरकर यांचे तैलचित्र लावण्यात आले होते तेव्हा. मुख्यमंत्री नरेंद्र मोदी व चंद्रकलाचे कौतुक करतांना भैरोसिंग शेखावत... खाली: चंद्रकलाने साकारलेली महाराष्ट्रातील थोर नेत्यांची-व्यक्तींची तैलचित्रें... कुमार व चंद्रकला कदम यांच्या सौजन्याने...*



पार्लमेंटच्या मध्यवर्ती सभागृहात राष्ट्रपती अब्दुल कलाम यांच्या हस्ते चंद्रकलानी साकारलेले वीर सावरकर यांचे तैलचित्र तसेच, गुजरात विधानसभेतील वीर सावरकर यांचे तैलचित्र हे उपराष्ट्रपती भैरोसिंग शेखावत यांच्या हस्ते लावण्यात आले. १९८८ साली म. जोतिबा फुले यांच्या चित्राचे दिवंगत पंतप्रधान राजीव गांधी यांच्या हस्ते उद्घाटन झाले होते. यावेळी चंद्रकलाचा सत्कारही करण्यात आला. नांदेड येथे नाटय़गृहात चंद्रकलानी साकारलेले शंकरराव चव्हाण यांचे तैलचित्र

लावण्यात आले होते. माजी राष्ट्रपती शंकर दयाळ शर्मा यांचे तैलचित्र त्यांना वाढदिवसाला भेट देण्यात आले होते. त्याचप्रमाणे, नवीन विधान भवनामध्ये चंद्रकलानी रेखाटलेली सर्व मुख्य-मंत्र्यांची तैलचित्रे, नाटय़गृहांमध्ये नाटय़ कलाकारांची तैलचित्रे, नवी मुंबई महापालिकामधील राष्ट्रपुरुषांची तैलचित्रे. विनय आपटे, शांता जोग, सयाजीराव गायकवाड, याचप्रमाणे स्केच, पोट्र्रेटची निर्मिती चंद्रकलाच्या कुंचल्यातून साकारलेली आहेत. गेली ४० वर्ष चंद्रकला या क्षेत्रात कार्यरत आहे...



*१) महाराष्ट्र प्रदेश कांग्रेस कमिटीच्या कार्यालयात इंदिरा गांधी यांच्या तैलचित्राचं अनावरणप्रसंगी: माजी पंतप्रधान राजीव गांधी, मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण व प्रदेशाध्यक्ष प्रभा राव व चंद्रकला... २) राजीव गांधी व गोविंदराव आदिक यांच्यासमवेत चंद्रकला... ३) महाराष्ट्र विधान सभेत चंद्रकला हिच्या सत्कार प्रसंगी. राजीव गांधी व शरद पवार...*



*१) राष्ट्रपती शंकर दयाल शर्मा यांच्या समवेत चंद्रकला व कुमार कदम... २) प्रज्ञा वर्षारंभ विशेषांक समारंभात केंद्रीय मंत्री सुधीलकुमार शिंदे यांच्या हस्ते 'प्रज्ञा' पुरस्कार स्विकरतांना चंद्रकला. बाजूला महाराष्ट्राचे मुख्य मंत्री विलासराव देशमुख... ३) मुलुंड येथील आपल्या स्टुडिओत एक कलाकृती साकारतांना चंद्रकला...*



*१) आपल्या कलाकृतीने गुन्हेगारांना यशस्वीपणे शोधून काढणारी चंद्रकला व तिची रेखाचित्रें... २) छोट्याशा छायाचित्रावरून कलाकृती निर्माण करतांना चंद्रकला... ३) नांवाप्रमाणे सुस्वरूप असलेली चंद्रकला... कुमार व चंद्रकला कदम यांच्या सौजन्याने...*

व्यक्तिचित्रण कलेमध्ये किंवा मनुष्याकृती काढण्याच्या कलेत चंद्रकलाने विशेष स्थान प्राप्त करतांना, एखाद्या व्यक्तीच्या वैशिष्ट्यांचा अभ्यास व त्यातील जिवंतपणा हे गुण आत्मसात केले होते. आणि हे विशेष व वेगळे काम करतांना या कलेद्वारे पोलिसांना गुन्हेगार शोधण्यासाठी चंद्रकलाने केलेली मदत फार मोलाची आहे. गुन्हेगारांच्या वर्णनांवरून, प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष दिलेल्या व मिळालेल्या माहितींवरून व भेटीवरून चंद्रकलाने रेखाटलेल्या हुबेहूब रेखाचित्रांमुळे शेंकडोंनी निरनिराळ्या शहरातील गुन्हेगार पोलिसांनी पकडून गजाआड केलेले आहेत. गुन्हेगारांच्या वर्णनांवरून चित्र कसे काढावे याविषयी पोलिसांसाठी मार्गदर्शनपर अनेक शिबिरेही चंद्रकलाने घेतलेली  आहेत. थोडक्यात, कुंचल्यातील कला जोपासताना चंद्रकलानी साकारलेली चित्रे म्हणजे, जिवंतपणाचाच साक्षात्कार घडवणारी, तर काही गुन्ह्यांतील संशयित गुन्हेगारांची हुबेहूब रेखाचित्रे रेखाटून, एक महिला असूनही चंद्रकलाने बेधडकपणे पोलिसांना मदत करून आपली कला समाजकार्य म्हणून जोपासली आहे. चित्रे साकारताना ती सहजतेने कलारसिकांना लुभावण्याचे कौशल्य चंद्रकला हिच्या चित्रांतून दिसून येते. चित्रं हुबेहूब वठविण्यासाठी करावी लागणारी मेहनत, रंगसंगती, चित्रात जिवंतपणा आणण्यासाठी त्या व्यक्तीचे डोळे, चेह-यावरील हावभाव, त्यांचा पोशाख, त्यांचे व्यक्तिमत्त्व चित्रातून साकारताना चंद्रकला कदम यांच्या कलेचा अप्रतिम दर्जा जिवंतपणाची

अनुभूती देऊन जातो. आणि म्हणूनच चित्रकर्ती चंद्रकला हिने गेली चाळीस वर्षे या क्षेत्रात मानाचे स्थान मिळविले आहे यात शंका नाही. मनोरंजनाबरोबर कलेच्या माध्यमातून चंद्रकलाने केलेली ही एक भूषणावह समाजसेवा होय.

राष्ट्रीय दर्जाची चित्रकार चंद्रकलाच्या चित्रांची जहांगीर आर्ट, सचिवालय जिमखाना, आदी ठिकाणी भरविण्यात आलेली चित्रप्रदर्शने तसेच चित्रे आणि रेखाचित्रांच्या माध्यमातून सुरू असणारे समाजकार्य पाहता, तिचे कार्य वाखाणण्याजोगेच म्हणावे लागेल. आजवर अनेक प्रदर्शने आयोजित केलेल्या चंद्रकलाला सन्मानपूर्वक अनेक पुरस्कार प्राप्त झाले आहेत. तिच्या पेंटिंगची देशोदेशी अनेक ठिकाणी प्रदर्शने भरवली गेली आहेत. तसेच, स्वित्झर्लंड, जर्मनी, केनिया व कोरियात कांही पेंटिंग्स विकली गेली आहते. मंगोलियाच्या प्रेसिडेंटच्या महालात तिची चित्रे मानाने लावली आहेत. हे कौतुकास्पद होय. चंद्रकला यांच्या कुंचल्यातून उमटलेली चित्रे, पोर्ट्रेट, रेखाचित्रे, तैलचित्रांच्या माध्यमातून ती विविध दिवाळी अंक, मासिकांच्या मुखपृष्ठांवर झळकून ती घराघरांत पोहोचली आणि कलेला दाद मिळवून देणारी ठरली आहेत. असो.

कलाकार हा कधीच निवृत्त होत नसतो अशी भावना ठेवणारी चंद्रकला आपलं सुखी जीवन अनुभवतांना अथवा रंगवतांना मुलुंडच्या भव्य स्टुडिओत बसून आपल्या हातामधील बहुरंगी पॅलेट कधीच खाली ठेवणार नाही हे निश्चित. तरीही माझ्या मनात एक विचार येऊन जातो, चित्रकाराला तिसरा डोळा असतो असं म्हणतात ते खरं आहे. मात्र, चंद्रकलाने साकारलेली असंख्य इतर व ऐतिहासिक तैलचित्रें पहिली की, प्रश्न पडतो की दोनच हात असतांना तिने हे कसं साध्य केलं, उंची कशी गांठली असेल..? हा एक दैवी चमत्कारच म्हणावा लागेल. 'My Hats Off to Her' असंच म्हणावं लागेल... असो. अशा या थोर व महान चित्रकर्ती चंद्रकला हिला हा माझा मानाचा मुजरा होय..!

जयंत विठ्ठल कुळकर्णी.
jvkny1@gmail.com

ता. क: कुमार व चंद्रकला यांनी हे दोन लेख लिहिण्यासाठी मला सर्वोतोपरी आनंदाने मदत केली. म्हणून तो सर्वांगाने नटला आहे. त्याबद्‌दल या दोघांचे मी मनापासून आभार मानतो.

---